भाजप नेतृत्वाखालील सरकारच्या अहंकाराबद्दल जाहीर नापसंती व्यक्त करणाऱ्या विधानांची राळ उडवून देताना संघ नेमका काय विचार करत आहे? सरसंघचालक मोहन भागवत यांचे संघ कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणाच्या समारोपाचे भाषण आणि संघाच्या कार्यकारी समितीचे सदस्य आणि संघ-समर्थित मुस्लिम राष्ट्रीय मंचचे मुख्य संरक्षक इंद्रेश कुमार यांनी दिलेल्या अहंकाराच्या विशिष्ट संदर्भाचा समावेश आहे. कुमार म्हणाले की, भगवान राम यांनी २४० जागांपर्यंत मर्यादित ठेवून भाजपला अहंकाराची शिक्षा दिली. रामराज्याच्या न्यायाने 'इंडिया' आघाडीलाही मतदारांनी २३७ पर्यंत आणखी खाली ठेवले कारण ते 'राम विरोधी' आहेत. दुसरीकडे संघ विचारवंत रतन शारदा यांनी 'द प्रिंट'ला दिलेल्या मुलाखतीत भाजपवर टीका केली, तर संघाचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझरमधील लेखात महाराष्ट्रातील पराभवासाठी अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससोबतच्या युतीला जबाबदार धरले. नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारवर संघाने गेल्या दशकात प्रथमच एवढ्या समन्वयाने टीका केल्याचे दिसते. भागवत यांनी त्यांच्या भाषणात विरोधकांपेक्षा प्रतिपक्षाची बाजू पसंत करतील, असे काहीसे संयत शब्दांत सांगितले. जे आपल्याला आपल्या पुढील प्रश्नाकडे घेऊन जाते; संघ काय साध्य करण्याचा प्रयत्न करीत आहे? या गोंधळात सत्तेचे राजकारण आणि राजकीय चर्चेतील आवाजाच्या सर्व छटा लपलेल्या आहेत.

सर्वप्रथम ताज्या 'हस्तक्षेपा'वर उदारमतवादी बाजूने आलेल्या प्रतिक्रियांवरून संघाची चांगलीच करमणूक झाली असणार. ज्यांनी अनेक दशकांपासून संघाच्या विचारधारेशी लढा दिला आहे, त्यांनी आता संघ प्रमुखांच्या टीकेमध्ये सांत्वन धुंडाळणे ही बाब जेवढी उपरोधिक तेवढीच त्यांची अगतिकता दाखविणारी आहे. भाजपला डिवचण्यासाठी काँग्रेसमधील काहींनी संघाच्या या भूमिकेमुळे नरेंद्र मोदी काही अंशी कमकुवत होतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. भागवतांच्या वक्तव्यानंतर लेख आणि सोशल मीडिया पोस्ट्सचा पाऊस पडला. त्याचा सूर 'तुम्ही (मोदी) आमचे ऐकणार नाही हे आम्हाला ठाऊक आहे. पण निदान भागवतांचे तरी ऐका' असाच आहे. ४ जूननंतरच्या बदललेल्या वातावरणाच्या पार्श्वभूमीवर संघ प्रमुखांचा मोदी-शहा यांच्या भाजपपेक्षा अधिक स्वीकार होताना दिसत आहे. परंतु, हे परिस्थितीचे अत्यंत चुकीचे आकलन ठरेल.

**कठोर परिश्रमाची सूचना**

वस्तुस्थिती अशी आहे की संघ-भाजप संबंधाच्या इतिहासात अधूनमधून अशी प्रेमीयुगुलाप्रमाणे भांडणे दिसून येतात. यामुळे क्वचितच काही बदलते. उघड नाराजीनंतर नागपुरातील संघ नेतृत्व कोणताही बदल घडवून आणेल, असे वाटणे म्हणजे त्यांचा हेतू आणि शक्ती या दोन्हींचा चुकीचा अर्थ काढणे आहे. या निवडणुकीने मोदींना पराभूत केले जाऊ शकते, हे त्यांच्या टीकाकारांना दाखवून दिले आहे. तथापि, ते साध्य करण्यासाठी पुढील पाच वर्षांमध्ये एकामागोमाग एक राज्याच्या निवडणुकीत कठोर परिश्रम घ्यावे लागतील. संघाचा आशीर्वाद असो वा नसो, कोणत्याही अंतर्गत सत्तापालटातून हे घडू शकत नाही. शिवाय संघ स्वतःच्याच सरकारला अस्थिर करण्याच्या मनःस्थितीत आहे असे सुचविण्यासारखे अक्षरशः काहीही नाही. जर संघ गुरू आणि सध्याचे भाजपचे नेतृत्व त्यांचे शिष्य असतील, तर ही टीका शिक्षकाने आवडत्या शिष्याच्या सुमार कामगिरीमुळे आलेल्या निराशेतून केली आहे, असे समजावे. याचा अर्थ असा नाही की संघ आणि भाजपमध्ये वेगवेगळ्या टप्प्यांवर मतभेद झालेले नाहीत. आपण तीन मतभेदांची यादी करूयात. मात्र, आता निवडणुकीच्या निकालानंतर संघाकडून झालेल्या टीकेचा या यादीत समावेश करता येणार नाही.

१९८० मध्ये मूळ भारतीय जनसंघाच्या विखुरण्यातून भाजपचा उदय झाला. त्यानंतर जवळपास दोन दशके संघ-भाजप संबंध कडू-गोड अशा स्वरूपाचे होते. या कटुतेची शिक्षा प्रत्येक वेळी भाजपला भोगावी लागली. १९८४, २००४ आणि आता २०२४ .

१९९८ मध्ये संघाने अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वात झालेल्या युतीचा उदय साजरा केला. मात्र, वाजपेयी यांचे व्यक्तिमत्त्व आणि स्वभाव तत्कालीन सरसंघचालक के. एस. सुदर्शन यांना मानवणारे नव्हते. २००३ मध्येही त्यांच्यातील संघर्ष सगळ्यांच्या पुढे आला. २००४ च्या निवडणुकीत संघाचा उत्साह कमीच होता कारण वाजपेयी आणि अडवानी यांनी पाच महिने आधीच निवडणूक घोषित केली होती. या निवडणुकीत भाजपला थोडक्यात पराभवाचा सामना करावा लागला होता. यानंतर एप्रिल २००५ मध्ये 'वॉक द टॉक' या मुलाखतीत सुदर्शन यांनी याची चिडचिड व्यक्त केली होती. या मुलाखतीसाठी सरसंघचालकांच्या कार्यालयातून विचारणा झाली होता. सरसंघचालक क्वचितच मुलाखत देत असल्याने मी मुलाखत मागितली नव्हती. यात वाजपेयींनी सत्ता गमावल्यानंतर सुदर्शन यांचा सूर 'बरे झाले अद्दल घडली. जर त्यांनी आमचे ऐकले असते तर.' असाच होता. या टप्प्यावर संघाने नरेंद्र मोदी यांच्यातील तरुण नेत्याचा उदयाची दखल घेतली होती. या युवा नेता त्यांच्या विचारधारेशी अधिक निष्ठावान होता.

आता २० वर्षे पुढे या. लोकसभा २०१४ च्या मोहिमेत संघ-भाजप संबंधात पुन्हा कटुता आली. भाजपला असा विश्वास वाटत होता की या निवडणुकीत फक्त मोदींच्या नावाने प्रचार केले की मोहीम फत्ते होणार. यामुळे संघाला थोडे अपमानित झाल्यासारखे वाटले असणार. मोदी यांनी कलम ३७० हटवणे, राम मंदिराची उभारणी आणि तिहेरी तलाक रद्द करणे असे धाडसी निर्णय घेतले असले तरीही संघाला थोडेसे डिवचल्यासारखे वाटले असावे. अयोध्येत प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला डॉ. मोहन भागवत यांना मानाचे स्थान देण्याची काळजी मोदींनी घेतली होती. विचारधारेचा मुद्दा नसला तरी स्वयंसेवकाला तो आता इतका अपरिहार्य नाही असे वाटले असावे. भागवत यांनी या आठवड्याच्या सुरुवातीला आपल्या भाषणात असे सांगितले की, संघाने नेहमीच जनतेच्या आवाजाला दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे, तर दुसरीकडे भाजपने असे म्हटले की, पक्षाला आता संघाची करंगळी धरून वाटचाल करण्याची गरज उरलेली नाही. परंतु, हे सारे निकालापूर्वी होते. हे सरकार तसेच मोदी आणि शहा यांची शक्ती संघासाठी एक अपरिहार्य ठरली आहे. विशेषतः ही संघटना शताब्दीकडे वाटचाल करीत असताना. म्हणूनच त्यांच्याकडून होत असलेल्या टीकेचा अर्थ शिक्षकाने आपल्या आवडत्या विद्यार्थ्याला फटकारले एवढाच आहे. याचा आणखी काही अर्थ काढणे चुकीचे ठरेल. हा स्तंभ लिहिला जात असताना भागवत हे गोरखपूरमध्ये होते आणि योगी आदित्यनाथ यांच्याशी ग्रामीण उत्तर प्रदेशात भाजपला बळकट करण्यासाठी काय करायला हवे याची चर्चा करीत आहेत.

**(अनुवाद : किशोर जामकर)**

### पूर्वीही धरली होती वेगळी वाट

**■ पंजाबमधील संकटामुळे चिंतित असलेल्या संघाने १९८४ मध्ये राष्ट्रीय हित लक्षात घेत असा निष्कर्ष काढला की राजीव गांधींच्या नेतृत्वाखाली देश अधिक सुरक्षित राहू शकतो आणि युतीत भाजपचाही समावेश असू शकतो. राजीव गांधी आणि तत्कालीन सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांच्यात भेट झाल्याच्या बातम्याही तेव्हा प्रकाशित झाल्या होत्या. त्या निवडणुकीत मी मध्य प्रदेश आणि दिल्लीतून वार्तांकन केले होते. त्यात संघाचे कार्यकर्ते भाजपच्या प्रचारात सहभागी झाले नाहीत तर स्थैर्य आणि राष्ट्रहितासाठी काँग्रेसला मत देण्याचा संदेश प्रसारित करताना आढळून आले. संघाला भाजपशी तशी काही तक्रार नव्हती. पण अद्याप त्यांची वेळ आली नाही, असे संघाचे मत होते.**

# निखिल गुप्ता यांना गुन्हा अमान्य

न्यूयॉर्क, ता. १८ : खलिस्तानवादी दहशतवादी गुरपतवंतसिंग पन्नून याच्या हत्येसाठी भाडोत्री गुंडांना पैसे दिल्याचा आरोप असलेले भारतीय नागरिक निखिल गुप्ता यांना आज येथील न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी त्यांनी त्यांच्यावर केलेले आरोप अमान्य केले. गुप्ता यांना मागील आठवड्यात चेक प्रजासत्ताक देशातून अमेरिकेत आणण्यात आले. या प्रकरणी गुप्ता यांच्यावर दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून दोषी सिद्ध झाल्यास त्यांना प्रत्येक प्रकरणी कमाल दहा वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. याप्रकरणी पुढील सुनावणी २८ जूनला होणार आहे.



निखिल गुप्ता

# ... १२ जुलैला मतदान

» पान १ वरून

विधानसभेच्या आमदारांकडून निवडून दिल्या जाणाऱ्या विधान परिषदेच्या ११ आमदारांचा कार्यकाळ येत्या २७ जुलै रोजी संपत आहे. या कार्यकाळ संपणाऱ्या आमदारांमध्ये अनिल परब ( ठाकरे गट), मनीषा कायंदे (शिवसेना शिंदे गट), डॉ. वजाहत मिर्झा व डॉ. प्रज्ञा सातव (काँग्रेस), बाबाजानी दुर्राणी (राष्ट्रवादी काँग्रेस), जयंत पाटील (शेकाप) विजय गिरकर, निलय नाईक, रमेश पाटील, रामराव पाटील (भाजप), महादेव जानकर (भाजप मित्र पक्ष) या आमदारांचा समावेश आहे.

भाजपचा पाच जागा निवडून आणण्यासाठी प्रयत्न असेल. शिंदे गट आणि अजित पवार गटही प्रत्येकी दोन जागांसाठी प्रयत्नशील आहेत. काँग्रेसचा एक उमेदवार सहजपणे निवडून येऊ शकतो. ठाकरे गट आणि शरद पवार गटाकडे स्वबळावर उमेदवार निवडून आणण्यासाठी पुरेसे संख्याबळ नाही; पण दोघांची मते एकत्र केल्यास एक उमेदवार निवडून येऊ शकतो.

# तरुणीची भररस्त्यात हत्या

» पान १ वरून

(वय २९) असे हत्या करणाऱ्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हे दोघेही एकाच परिसरातील राहणारे असून त्यांचे सहा वर्षांपासून प्रेमप्रकरण सुरू होते; मात्र मागच्या सहा महिन्यांपासून दोघांत वाद सुरू होता. प्रेयसीचे दुसऱ्यासोबत प्रेमप्रकरण सुरू असावे, असा संशय प्रियकराला होता. याच संशयातून आरोपीने आज पाळत ठेवून, आरती सकाळी कामावर जात असताना वसई पूर्व चिंचपाडा या परिसरात पाठीमागून येऊन, लोखंडी पाना तिच्या डोक्यात मारला. ती रक्ताच्या थारोळ्यात जखमी अवस्थेत पडली असता पुन्हा अतिशय क्रूरतेने तिच्या डोक्यात १५ ते १६ वार करून तिला जाग्यावरच जीवे मारले. हा सर्व प्रकार सुरू असताना एका व्यक्तीने आरोपीला अडविण्याचा प्रयत्न केला; पण त्याला तो आवरला नाही. ही हत्या होताना ५० ते १०० जण पाहत होते. अनेकांनी हत्येचा थरार आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला; पण कोणीही त्याला अडवू शकले नाही. त्यामुळे लोकांमधील माणुसकी मेली काय, अशा संतप्त भावना व्यक्त होत आहेत.

**पोलिसांवर गंभीर आरोप**

'आरतीचा मोबाईल आरोपीने फोडल्यावर हा वाद आचोळा पोलिस ठाण्यात पोहचला. त्यानंतर पोलिसांनी आरोपीवर कारवाई न करता एन. सी. दाखल करण्यासाठी टाळाटाळ केली,' असा आरोप तरुणीच्या बहिणीने पोलिसांवर केला आहे; पण आचोळा पोलिसांनी हा वाद रात्री साडेअकराला आल्यावर पावणेबाराला एन. सी. दाखल करून घेतल्याचे सांगत मृत तरुणीच्या बहिणीचे आरोप फेटाळले.

८ जूनला रात्री ८ वाजण्याच्या सुमारास शिर्डीनगर परिसरात आरती यादवचा आरोपी रोहित यादवने मोबाईल फोडला होता. तरुणीने मोबाईलची भरपाई मागितली तेव्हा आरोपीने नकार दिल्यावर हा वाद पोलिस ठाण्यात पोहचला; पण दोघांमध्ये प्रेमप्रकरण असल्याचे पोलिसांना सांगितले नाही. त्याच रात्री आरती बहिणीसोबत रात्री पावणेबारा वाजण्याच्या सुमारास आल्यावर तत्काळ एन. सी. दाखल केली होती. ९ जूनला सकाळी आरोपी तरुणाला बोलविण्यात आल्यावर तो हजर झाला होता. १२ वाजण्याच्या सुमारास आरती बहिणीसोबत पोलिस ठाण्यात आली. आरोपीला पोलिसांनी खाक्या दाखविण्यास सुरुवात केल्यावर आरतीने पोलिसांना थांबविले व कारवाई करू नका म्हणून विनंती केली. प्रकरण मिटवून घेऊ, असे तिने पोलिसांना सांगितले; तरीही आचोळा पोलिसांनी १४९ची नोटीस देऊन कारवाई करण्यात आल्याचे आचोळ्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी सांगितले.

## एशियाटिक सोसायटीच्या विश्वस्तपदी डॉ. मुणगेकर

मुंबई, ता. १८ : मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व राज्यसभेचे माजी सदस्य डॉ. भालचंद्र मुणगेकर यांची मुंबईतील एशियाटिक सोसायटीच्या विश्वस्तपदी आज नियुक्ती करण्यात आली आहे. एशियाटिक सोसायटीच्या सचिव मंगला सरदेशपांडे यांनी आज डॉ. मुणगेकर यांची एशियाटिकच्या विश्वस्तपदी नियुक्ती झाल्याचे पत्र जारी केले आहे. डॉ. मुणगेकर हे राज्यातील विविध साहित्य क्षेत्रात कार्यरत असलेल्या संस्थांसह मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाशी संबंधित आहेत.

## निष्काळजीपणा खपवून घेऊ नका

» पान १ वरून

कारवाईदेखील करत आहोत. किमान यामुळे तरी तुमच्या कार्यपद्धतीमध्ये सुधारणा होईल,'' अशा शब्दांत न्यायालयाने 'एनटीए'च्या वकिलांना सुनावले.

**म्हणणे मांडावे लागणार**

'या प्रकरणामध्ये वेळेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी,' अशी अपेक्षा व्यक्त करतानाच न्यायालयाने याबाबतच्या ताज्या याचिकांवर अन्य प्रलंबित याचिकांसोबत ८ जुलै रोजी सुनावणी घेण्यात येईल, असे सांगितले. या याचिकांमध्ये 'नीट' परीक्षा पुन्हा घेण्यात यावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकांचाही समावेश आहे. केंद्र आणि 'एनटीए'ला यावर दोन आठवड्यांच्या आत म्हणणे मांडावे लागेल. अनेक याचिकाकर्त्यांनी परीक्षेदरम्यान विचारण्यात आलेल्या प्रश्नांचाही मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर पीठाने 'एनटीए' आणि केंद्र सरकार याबाबत उत्तर देईन, असे नमूद केले.

## ...भाजपत खल

» पान १ वरून

चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार, विनोद तावडे, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे आणि माजी मंत्री पंकजा मुंडे आदी उपस्थित होते.

**मित्रांशी समन्वय साधणार**

तिन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये व प्रचारामध्ये समन्वय साधण्यासाठी समन्वय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. यामुळे प्रत्येक पक्षाला आपली बाजू समन्वय समितीमध्ये मांडता येईल, असे सांगण्यात आले. येत्या चार महिन्यांत राज्य सरकारची प्रतिमा चांगली करणे व त्यासाठी आवश्यक निर्णय तातडीने घेण्यावर यावर चर्चा झाल्याचे कळते. भाजपच्या या कोअर समितीच्या बैठकीला माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी पहिल्यांदाच हजेरी लावली.

vedanta transforming for good

**वेदांता लिमिटेड**

**CIN: L13209MH1965PLC291394**

नोंदणीकृत कार्यालय : १ ला मजला, सी विंग, युनिट १०३, कॉर्पोरेट अॅव्हेन्यू, अतुल प्रोजेक्ट्स, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई -४०० ०९३, महाराष्ट्र, भारत.
दूरध्वनी क्रमांक: +९१ २२ ६६४३ ४५००; फॅक्स: +९१ २२ ६६४३ ४५३०, ईमेल आयडी: comp.sect@vedanta.co.in, संकेतस्थळ : www.vedantalimited.com

**५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदान**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या सभासदांची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **(AGM/Meeting)** बुधवार, १० जुलै २०२४ रोजी दुपारी ३:०० वाजता (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग **(VC)** / इतर दृकश्राव्य माध्यमाद्वारे **(OAVM)** द्वारे सूचनेमध्ये स्थापित व्यवसाय व्यवहार करण्यासाठी होणार आहे (सूचना).

मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सद्वारे **(MCA)** जारी सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३ सह याबाबतीमध्ये एमसीएद्वारे जारी इतर परिपत्रकांसह एकत्रितपणे वाचावा (एकत्रितपणे संदर्भित **MCA परिपत्रके**) आणि सिक्युरिटीज एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडियाद्वारे **(सेबी)** जारी परिपत्रक क्र. SEBI/HO/CFD/CFD-PoD-2/P/CIR/2023/167 दिनांक ०७ ऑक्टोबर २०२३ आणि याबाबतीत सेबीद्वारे जारी इतर मागील परिपत्रके (एकत्रित संदर्भित **सेबी परिपत्रके**) कंपनीला सभासदांच्या समक्ष उपस्थितीशिवाय VC किंवा OAVM द्वारे साधारण ठिकाणी येथे ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत एजीएम आयोजित करण्यास परवानगी दिली आहे. त्यानुसार, कंपनीची एजीएम VC/OAVM द्वारे होणार आहे.

एमसीए आणि सेबी परिपत्रकांसह संबंधितमध्ये, कंपनीने एकात्मिक अहवाल आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ साठीचे वार्षिक लेखे **(एकात्मिक वार्षिक अहवाल)** इलेक्ट्रॉनिक पर्यायाद्वारे केवळ त्यांच्या अशा सर्व सभासदांना पाठवले आहेत ज्यांचे ईमेल आयडी कंपनी / डिपॉजिटरी पार्टिसिपंट्ससह (DPs) नोंदणीकृत आहेत. सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिकली पाठविण्याचे काम मंगळवार १८ जून २०२४ रोजी पूर्ण झाले आहे.

सभासदांनी नोंद घ्यावी की, सूचनेसह एकात्मिक वार्षिक अहवाल कंपनीचे संकेतस्थळ www.vedantalimited.com आणि नॅशनल सिक्युरिटिज डिपॉजिटरी लिमिटेडचे **( NSDL)** संकेतस्थळ www.evoting.nsdl.com आणि बीएसई लिमिटेडचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे www.nseindia.com येथे सुद्धा उपलब्ध आहे.

लागू तरतुदींच्या अटीमध्ये, कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि त्याअंतर्गत बनविण्यात आलेल्या नियमांनुसार, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियमन २०१५ **(सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स)** चे नियमन ४४, वेळोवेळी सुधारीत, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया आणि एमसीए परिपत्रकाद्वारे जारी सेक्रेटरियल स्टँडर्ड - २ नुसार इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे एजीएम येथे मंजूर प्रस्तावित ठरावांवर मतदानांच्या त्यांच्या हक्कांसाठी कंपनीच्या सभासदांना ई-मतदान सुविधा पुरविण्यासाठी (एजीएमदरम्यान ई-मतदान आणि एजीएमपूर्वी रिमोट ई-मतदान) NSDLच्या सेवेची एजन्सी म्हणून कंपनीने नियुक्ती केली आहे.

सभासद फक्त VC/OAVM सुविधेद्वारे एजीएमला उपस्थित किंवा सहभागी होऊ शकतील किंवा प्रोसिडिंग्जचा लाईव्ह वेबकास्ट पाहू शकतील. VC/OAVM द्वारे एजीएममध्ये सहभाग आणि ई-मतदानासाठीची तपशिलवार प्रक्रिया किंवा लाईव्ह वेबकास्ट पाहाणे सूचनेच्या नोंदीमध्ये पुरविण्यात आलेली आहे. नियोजित वेळेपूर्वी तीस (३०) मिनिटे सभासद सभेस सहभागी होऊ शकतील आणि सभेद्वारे लॉगइन खुले ठेवण्यात येईल. प्रथम येईल त्यास प्राधान्य या तत्त्वावर १००० सभासदांसाठी VC/OAVM सुविधेद्वारे एजीएम येथे सहभागाची सुविधा उपलब्ध राहील. जे सभासद एजीएमपूर्वी रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान करतील ते सभेस उपस्थित राहू शकतील मात्र ते त्यांचे मतदान पुन्हा करु शकणार नाहीत. जे सभासद VC/OAVM द्वारे एजीएममध्ये सहभागी झाले आहेत आणि रिमोट ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान करु शकले नाहीत ते एजीएमदरम्यान मतदान करु शकतील.

एजीएमच्या दिनांकापूर्वी रिमोट ई-मतदान सुविधा ही खालील कालावधीदरम्यान उपलब्ध होईल. (दोन्ही दिवस समाविष्ट)

| | |
|---|---|
| **रिमोट ई-मतदानाची सुरुवात** | शुक्रवार, ०५ जुलै २०२४ रोजी सकाळी ९:००पासून (भाप्रवे) |
| **रिमोट ई-मतदान समाप्ती** | मंगळवार, ०९ जुलै २०२४ रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत (भाप्रवे). |

त्यानंतर मतदानासाठी NSDL द्वारे ई-मतदान मॉड्यूल खंडित केले जाईल आणि त्या दिनांकाच्या आणि वेळेच्या पुढे रिमोट ई-मतदानास परवानगी देण्यात येणार नाही.

ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या रजिस्टरमध्ये किंवा डिपॉजिटरीजद्वारे ठेवलेल्या लाभार्थी ओनर्सच्या रजिस्टरमध्ये कट-ऑफ दिनांकारोजी म्हणजेच बुधवार, ०३ जुलै, २०२४ रोजी नोंदवले गेले आहे, फक्त तीच व्यक्ती एजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीची सुविधा आणि एजीएमपूर्वी रिमोट ई-मतदानाची सुविधा प्राप्त करण्यास पात्र राहील. कट-ऑफ दिनांका रोजी सभासद नसलेल्या व्यक्तीने एजीएमची सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने पाहावी. सभासदाने ठरावावर एकदा मतदान केले की, नंतर त्यात बदल करण्याची परवानगी सभासदाला दिली जाणार नाही. सभासदांचे मतदानाचे अधिकार कट-ऑफ दिनांकाला कंपनीच्या पेड-अप इक्विटी भाग भांडवलाच्या त्यांच्या भागांच्या प्रमाणात असतील. सूचना पाठवल्यानंतर भाग घेणारी आणि कंपनीची सभासद बनणारी कोणतीही व्यक्ती, आणि कट ऑफ दिनांकारोजी भागधारण करणारी व्यक्ती, एजीएम दरम्यान रिमोट ई-मतदान किंवा ई-मतदान प्रणालीच्या सुविधेसाठी लॉगइन आयडी आणि पासवर्ड NSDL यांना evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवून प्राप्त करु शकेल.

ई-मतदाना संबंधित कोणत्याही शंका/तक्रारींच्या बाबतीत जसे की, एजीएमपूर्वी आणि/किंवा दरम्यान, तुम्ही भागधारकांसाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न **(FAQs)** आणि www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभाग येथे भागधारकांसाठी असलेले ई-मतदान यूजर मॅन्युअल पाहू शकता किंवा NSDL यांना evoting@nsdl.co.in वर संपर्क साधू शकता किंवा ०२२ ४८८६ ७००० वर कॉल करा किंवा श्रीमती पल्लवी म्हात्रे, सीनिअर मॅनेजर यांना evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवू शकता.

ज्या सभासदांचे ईमेल आयडी नोंदणीकृत नाहीत आणि ज्यांना कंपनीकडून वेळोवेळी एजीएमची सूचना, वार्षिक अहवाल आणि इतर सर्व संपर्क वेळोवेळी प्राप्त करावयाचा आहे, त्यांनी ISR-1 फॉर्म कफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (पूर्वीचे नाव कफिन टेक्नॉलॉजिज प्रायव्हेट लिमिटेड) कंपनीचे रजिस्ट्रार आणि हस्तांतरण प्रतिनिधी einward.ris@kfintech.com किंवा कंपनीला येथे comp.sect@vedanta.co.in येथे सादर करुन त्यांच्या ई-मेल आयडीचे नोंदणीकरण करु शकतील. तसेच, डीमॅट स्वरूपात भाग असलेल्या सभासदांनी, त्यांच्या संबंधित डीपींना लिहिण्याची विनंती करण्यात येत आहे.

याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ च्या अनुषंगाने कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १० आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या लागू तरतुदीनुसार सभासदांचे रजिस्टर आणि कंपनीचे भाग हस्तांतरण पुस्तक शुक्रवार ०५ जुलै २०२४ पासून ते मंगळवार ०९ जुलै २०२४ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) एजीएमच्या हेतूसाठी बंद राहील.

पारदर्शक आणि निष्पक्ष वातावरणामध्ये रिमोट ई-मतदानाच्या समावेशासह ई-मतदान प्रक्रिया आयोजित करण्यासाठी छाननीकार म्हणून श्री. उपेंद्र शुक्ला, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी (FCS No. 2727, CP No.1654) यांची नियुक्ती कंपनीने केली आहे. एजीएमच्या मतदानाचे निकाल छाननीकर्त्याच्या अहवालासह वैधानिक कालमर्यादेनुसार घोषित केले जातील आणि कंपनीच्या संकेतस्थळावर म्हणजेच, www.vedantalimited.com, स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच, www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि NSDL संकेतस्थळ www.evoting.nsdl.com. येथे दर्शविण्यात येतील.

**वेदांता लिमिटेडकरिता**
**प्रेरणा हलवासिया**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**ACS 20856**

**ठिकाण: नवी दिल्ली, भारत**
**दिनांक : १९ जून २०२४.**

mahindra LOGISTICS

**महिन्द्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड**

**नोंदणीकृत कार्यालय:** महिन्द्रा टॉवर्स, पी. के. कुरणे चौक, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
**कॉर्पोरेट कार्यालय:** १० वा आणि ११ वा मजला, अरेना स्पेस, मजास बस डेपो जवळ, जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६०.
**वेबसाइट:** www.mahindralogistics.com • **ई-मेल:** cs.mll@mahindra.com
**फोन:** +९१ २२ ६८३६ ७९०० / २४९० १४४१ • **कंपनी ओळख क्र.:** एल६३०००एमएच२००७पीएलसी१७३४६६ • **आयएसआयएन नंबर :** आयएनई७६६पी०१०१६

**व्हिडिओ कॉन्फरंसिंग ("व्हीसी")/इतर ऑडिओ-विजूअल माध्यमांद्वारे ("ओएव्हीएम") भरवल्या जाणाऱ्या १७ व्या वार्षिक सामान्य सभेची माहिती, पुस्तक समाप्ती, अंतिम लाभांश आणि लाभांशावर विथहोल्डिंग कराची सूचना.**

ह्याद्वारे सूचना दिली जात आहे की **महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेडची ('कंपनी') १७ वी वार्षिक सामान्य सभा (" एजीएम")** कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') मधील तरतुदी, त्यात केलेल्या नियमांसोबत, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडियाने ('सेबी') (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स') ने जारी केलेल्या परिपत्रकांसोबत, कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालयाने ("एमसीए") जारी केलेल्या परिपत्रकांसोबत आणि **व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएम पार पाडण्याची सेबीच्या परवानगीनुसार, व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सोमवार, २२ जुलै २०२४ रोजी दुपारी ३:३० वाजता (भारतीय प्रमाणवेळ),** १७ व्या एजीएम कळवणाऱ्या सूचनेतील कामकाज पार पाडण्यासाठी भरवली जाणार आहे.

सदस्य १७ व्या एजीएममध्ये फक्त व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे सहभागी होऊ शकतात. कंपनीने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडची ("एनएसडीएल") सेवा स्वीकारली आहे, जी व्हीसी/ओएव्हीएम सुविधा आणि दूरस्थ ई-मतदान सुविधा १७ व्या एजीएममधील सदस्यांना पुरवणार आहे.

**१. सूचना आणि वार्षिक अहवाल ईमेल द्वारे पाठवला आहे**

वरील कायदे आणि लागू परिपत्रकांच्या पूर्ततेसाठी, १७ वी एजीएम कळवणाऱ्या सूचनेच्या इलेक्ट्रॉनिक प्रती आणि आर्थिक वर्ष ('एफव्हाय') २०२३-२४ चा एकीकृत वार्षिक अहवाल नेमून दिलेल्या वेळेत फक्त त्या सदस्यांना आणि पात्र असलेल्या सर्व व्यक्तींना फक्त इलेक्ट्रोनिक पद्धतीने (ई-मेल) पाठवला जाईल ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी किंवा लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, कंपनीचे रजिस्ट्रार आणि शेअर ट्रांसफर एजंट ('लिंक इनटाइम') किंवा डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स ('डीपी') ह्यांच्याकडे नोंदवलेले आहेत. तसेच, एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चा एकीकृत वार्षिक अहवाल कंपनीच्या **https://www.mahindralogistics.com** वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंजेसच्या म्हणजे बीएसई लिमिटेडच्या **https://www.bseindia.com** वेबसाइटवर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या **https://www.nseindia.com** वेबसाइटवर आणि एनएसडीएलच्या **https://www.evoting.nsdl.com** वेबसाइटवर अपलोड आणि उपलब्ध केला जाईल. विनंती केल्यावर सदस्यांना वार्षिक अहवाल आणि एजीएमच्या सूचनेची भौतिक प्रत दिली जाईल. व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये सहभागी होण्याच्या तपशीलवार सूचना आणि प्रक्रिया १७ व्या एजीएमच्या सूचनेत दिली जाईल. सदस्यांना विनंती आहे की त्याचा संदर्भ घ्यावा.

**२. ई-मेल पत्ता नोंदवण्याची किंवा अद्ययावत करण्याची प्रक्रिया आणि पध्दत**

ज्या सदस्यांनी कंपनी/लिंक इनटाइम/डीपीकडे आपला ई-मेल पत्ता नोंदवला नाही/अद्ययावत केला नाही त्यांना विनंती करत आहोत की एजीएमची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२३-२४ चा एकीकृत वार्षिक अहवाल व ई-मतदानाची माहिती आणि व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये सहभागी होण्याची माहिती प्राप्त करण्यासाठी आपला ई-मेल पत्ता लगेच नोंदवावा/अद्ययावत करावा, त्यासाठी खालील प्रक्रियेचा अवलंब करावा:

- लिंकवर क्लिक करा: **https://linkintime.co.in/EmailReg/Email_Register.html**
- कंपनीचं नाव सिलेक्ट करा, उदाहरणार्थ: महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड.
- डीपी आयडी आणि क्लायंट आयडी/ फिजिकल फोलिओ नंबर आणि पॅनचा तपशील, ई-मेल पत्ता व मोबाईल नंबर एंटर करा. जर फिजिकल फोलिओसाठी पॅनचा तपशील उपलब्ध नसेल तर सदस्याने त्याचा/तिचा शेअर सर्टिफिकेट नंबर एंटर करावा.
- तपशील सबमिट केल्यावर शेअरहोल्डरला एक ओटीपी प्राप्त होईल, जो पडताळणीसाठी लिंकमध्ये भरणे आवश्यक आहे. नंतर १७ व्या एजीएमची सूचना आणि २०२३-२४ चा एकात्मिक वार्षिक अहवाल प्राप्त करण्यासाठी ई-मेल पत्त्याची सिस्टिमकडून खात्री केली जाईल.

ई-मेल पत्त्याची यशस्वी नोंद झाल्यानंतर, कंपनी ही एजीएम सूचना आणि एकात्मिक वार्षिक अहवाल ह्यांच्या ई-मेल प्रतीची व्यवस्था करेल. कृपया लक्षात घ्या की वरील वेब-पोर्टलद्वारे ई-मेल पत्त्याचे अद्ययावतीकरण तात्पुरते आणि १७ व्या एजीएमच्या उद्देशाने मर्यादित असेल.

**कायमस्वरूपी नोंदीसाठी/नूतनीकरणासाठी डिमॅट स्वरूपात धारणा केलेल्या भागधारकांना विनंती करत आहोत की डीपीने सांगितलेल्या प्रक्रियेनुसार आपला ई-मेल पत्ता नोंदवावा/अद्ययावत करावा. भौतिक स्वरूपात धारणा केलेल्या भागधारकांना विनंती करत आहोत की फॉर्म आयएसआर-१ पूर्ण भरून, त्यावर स्वाक्षरी करून सहाय्यक कागदपत्रांसह लिंक इनटाइम, सी-१०१, १ ला मजला, २४७ पार्क, एल बी एस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई- ४०० ०८३ वर कुरियरद्वारे पाठवावा. (युनिट: महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेड).**

**३. १७ व्या एजीएममध्ये मतदान करण्याची पध्दत**

कंपनीला आपल्या सर्व सदस्यांना दूरस्थ ई-मतदान (सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून त्यांचे मत देण्यासाठी) आणि १७ व्या एजीएम दरम्यान (ज्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केले नाही अशा सर्व सदस्यांसाठी) ई-मतदानाची सुविधा उपलब्ध करून देताना आनंद होत आहे. एजीएममध्ये दूरस्थ ई-मतदान आणि ई-मतदानाद्वारे मतदान करण्याच्या तपशीलवार सूचना आणि प्रक्रिया १७ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये दिल्या आहेत.

सदस्याचा ई-मेल पत्ता कंपनी/लिंक इनटाइम/डीपी वर नोंदणीकृत असल्यास, लॉगिन क्रेडेन्शियल आणि दूरस्थ ई-मतदान आणि एजीएममध्ये ई-मतदानाची प्रक्रिया नोंदणीकृत ई-मेल पत्त्यावर पाठविली जाईल. सदस्यांना विनंती आहे की त्यांनी लवकरात लवकर कंपनी/लिंक इनटाइम/डीपी सोबत त्यांचा ई-मेल पत्ता नोंदवावा/अपडेट करावा.

ज्या सदस्यांचा ई-मेल आयडी कंपनी/ डीपी/लिंक इनटाइममध्ये नोंदणीकृत नाही, त्यांनी वर दिलेल्या ई-मेल पत्त्याची नोंदणी किंवा अपडेट करण्याची प्रक्रिया आणि पद्धत पहावी किंवा पर्यायाने एनएसडीएलला **evoting@nsdl.co.in** वर विनंती पाठवू शकता, ज्यामुळे त्यांच्याद्वारे मार्गदर्शन केलेल्या योग्य प्रक्रियेचे अनुसरण करून ई-मतदानासाठी वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मिळेल.

**४. अंतिम लाभांश आणि पुस्तक समाप्तीची सूचना**

कंपनीच्या संचालक मंडळाने आपल्या २२ एप्रिल २०२४ रोजी झालेल्या सभेत आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी प्रत्येकी ₹ १०/- दर्शनी मुल्याच्या प्रत्येक इक्विटी शेअरवर (२५%) ₹ २.५०/- अंतिम लाभांशाची शिफारस केली आहे, जी एजीएममधील सदस्यांच्या मान्यते अधीन आहे.

कायद्याचे कलम ९१ आणि त्यात तयार केलेले नियम आणि सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सचा नियम ४२ नुसार ह्याद्वारे सूचना दिली जात आहे की सदस्यांची नोंदवही आणि कंपनीची भाग हस्तांतरण पुस्तिका शनिवार, १३ जुलै २०२४ ते सोमवार, २२ जुलै २०२४ (दोन्ही दिवसांचा समावेश) आर्थिक वर्ष २०२३-२४ साठी अंतिम लाभांशाकरिता सदस्यांची पात्रता लक्षात घेण्यासाठी, जर १७ व्या एजीएममध्ये घोषणा झाली आणि मान्य झाली तर, बंद राहील. जर अंतिम लाभांशाची घोषणा झाली तर कंपनीकडून मान्य पध्दतीने मंगळवार, २३ जुलै २०२४ रोजी किंवा त्यानंतर नेमून दिलेल्या वेळेत ज्या सदस्यांची नावे शुक्रवार, १२ जुलै २०२४ रोजी ('नोंदीची तारीख') समाप्त होणाऱ्या कामकाजाच्या तासाला लाभार्थी मालक/सदस्यांच्या नोंदवहीत आहेत त्यांना तो दिला जाईल/पाठवला जाईल.

**५. थेट बँकेच्या खात्यात लाभांश प्राप्त करण्यासाठी बँक खात्याचा तपशील अद्ययावत करण्याची पद्धत**

ज्या सदस्यांनी आपल्या बँक खात्याचा तपशील/ मँडेटस अद्ययावत केला नाही त्यांना विनंती आहे की १२ जुलै २०२४ आधी तो खालील पद्धतीने अद्ययावत करावा, ज्यामुळे त्यांना इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सेवेद्वारे किंवा इतर माध्यमातून थेट त्यांच्या खात्यात लाभांश मिळेल:

| धारकाचा प्रकार | अवलंब करायची प्रक्रिया |
|---|---|
| डिमॅट स्वरूपात भागधारणा करणारे सदस्य | तुमच्या डीपीने सल्ला दिलेल्या प्रक्रियेनुसार, तुमच्या डिमॅट खात्यात इलेक्ट्रॉनिक बँक मॅनडेट अद्ययावत करण्यासाठी / बँकेचा तपशील नोंदवण्यासाठी कृपया तुमच्या डीपीला संपर्क करा. |
| भौतिक स्वरूपात भागधारण करणाऱ्या भागधारकांसाठी | फॉर्म ISR-१ पूर्ण भरून सर्व सहाय्यक कागदपत्रांसह लिंक इनटाइमकडे कुरियरने सी -१०१, १ ला मजला, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३ येथे पाठवा. (युनिट: महिंद्रा लॉजिस्टिक लिमिटेड) |

**६. पॅन, बँक खाते, केव्हायसी आणि नामांकनाचा तपशील अद्ययावत करण्याची विनंती**

कंपनीकडे भौतिक स्वरूपात भागधारणा करणारे सदस्य नाहीत. म्हणून, सदस्यांना माहिती दिली जात आहे की एसईबीआय मॅनडेट नुसार भौतिक स्वरूपात भागधारणा करणाऱ्यांकडे पॅन, वारस नोंद आणि कीव्हायसी तपशील (संपर्काचा तपशील, बँक खात्याचा तपशील आणि स्वाक्षरीचा नमुना) नसेल तर ते लाभांश, व्याज किंवा विमोचन ह्यांसह कोणत्याही पेमेंटसाठी १ एप्रिल २०२४ पासून फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने पात्र आहेत, ज्यासाठी त्यांनी कंपनीला वरील तपशील द्यावा.

**७. करासंबंधी कागदपत्रे सादर करणे**

जर अंतिम लाभांशाची घोषणा झाली तर तो कंपनीकडून पुस्तक समाप्ती तारखेला सदस्याच्या वर्गवारीनुसार लागू दराने डिडक्शन ऑफ विथहोल्डिंग टॅक्सच्या ('टीडीएस') अधीन असेल. कंपनीला योग्य टीडीएस ठरवण्यासाठी आणि त्याची कपात करण्यासाठी भागधारकांना विनंती आहे की त्यांनी करातील सूटचा फॉर्म सादर करावा आणि सोबत सहाय्यक कागदपत्रे व स्वयंप्रमाणित केलेली पॅनची प्रत लिंक इनटाइमच्या **https://liiplweb.linkintime.co.in/formsreg/submission-of-form-15g-15h.html** किंवा **mlldivtax@linkintime.co.in** किंवा **cs.mll@mahindralogistics.com** वर ईमेल पाठवून शुक्रवार, १२ जुलै २०२४ रोजी किंवा आधी दाखल करावी. शुक्रवार, १२ जुलै २०२४ नंतर नोंदणीकृत भागधारक वगळता इतर व्यक्तीकडे कर/कर कपात/विनंती सादर करण्यासाठी कोणताही संपर्क साधला जाणार नाही. लाभांशावरील टीडीएसशी संबंधित तरतुदी तसेच लागू कर दराचा लाभ घेण्यासाठी सादर करावयाच्या संबंधित कागदपत्रांची सदस्यांना माहिती देणारा ई-मेल संप्रेषण कंपनीने १३ जून २०२४ रोजी सदस्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पाठवला होता. . सदस्य कंपनीच्या वेबलिंक **https://mahindralogistics.com/shareholder-information/dividend/** वर दिलेल्या संप्रेषणाचा संदर्भ देखील घेऊ शकतात.

**महिंद्रा लॉजिस्टिक्स लिमिटेडसाठी**
**स्वाक्षरी/-**

**जिग्नेश पारीख**
**कंपनी सचिव**
**मेंबरशिप नं.: ACS 20413**

स्थळ: मुंबई
दिनांक: १९ जून २०२४

12175234MAR